


# वाढदिवसाचा संदेश


अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जुलै २०२६

वर्ष ५१ अंक ०७

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

हातचे काहीही राखून न ठेवता, स्वतःच्या सर्व घटकांनिशी जे ईश्वराला समर्पित होतात अशा साधकांना, ईश्वर स्वतःला देऊ करतो. अशा साधकांना स्थिरता, प्रकाश, शक्तिसामर्थ्य, परमानंद, स्वातंत्र्य, विशालता, ज्ञानाची उत्तुंगता आणि आनंदसागर या गोष्टी प्राप्त होतात.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 67)

*

# वाढदिवसाचा संदेश

संपादकीय........................................................०२
वाढदिवसाचे महत्त्व..............................................०३
शुभाशीर्वाद.....................................................१५
नवजन्म.........................................................२५
काही आठवणी....................................................३३
श्रीअरविंद लिखित प्राज्ञवचन आणि त्याचा मथितार्थ............३६

---

## संपादकीय

सामान्य जीवनामध्ये वाढदिवस या गोष्टीला खूप महत्त्व दिलेले आढळते. परंतु त्यामध्ये आध्यात्मिकदृष्ट्या देखील मोठा अर्थ सामावलेला आहे, हे सहसा लक्षात घेतले जात नाही. श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनी या दिवसाचे महत्त्व वैश्विक स्तरावरून अधोरेखित केले आहे. आध्यात्मिकदृष्ट्या जन्मदिनाला काही विशेष महत्त्व असल्यामुळेच साधक त्या दिवशी श्रीमाताजींच्या भेटीस जात असत. वाढदिवसाचे आध्यात्मिक महत्त्व आणि श्रीअरविंदांनी व श्रीमाताजींनी साधकांना दिलेले संदेश या अंकात समाविष्ट करत आहोत. 'वाढदिवसाचा संदेश' या विषयाला 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक वाहिलेला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# वाढदिवसाचे महत्त्व

(श्री. मोना सरकार हे श्रीमाताजींचे एक ज्येष्ठ अनुयायी. श्रीमाताजींबरोबर त्यांचे जे संवाद झाले ते त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. मूळ फ्रेंचमधील हे संभाषण श्रीमाताजींना वाचून दाखविण्यात आले होते.)

श्रीमाताजी : उद्या तुमचा वाढदिवस आहे का?

मोना : हो, माताजी.

श्रीमाताजी : मी तुम्हाला उद्या भेटेन तेव्हा तुम्हाला एक विशेष गोष्ट देणार आहे. म्हणजे, ती कोणती भौतिक गोष्ट नाहीये. मी एक शुभेच्छापत्र देईन, भौतिक गोष्ट म्हणाल तर फक्त तेवढीच असेल.. तुम्ही उद्या मला भेटा, आत्ता आता घरी जा आणि स्वतःची शांतपणे तयारी करा म्हणजे मग मी जे देणार आहे ते स्वीकारण्यासाठी तुम्ही सज्ज झालेले असाल.

मोना : होय माताजी.

श्रीमाताजी : Bonne Fête या फ्रेंच वचनाचा अर्थ काय आहे हे तुम्हाला माहीत आहे का? म्हणजे इथे वाढदिवसाच्या प्रसंगी आपण कोणती शुभेच्छा बाळगतो, हे तुम्हाला माहीत आहे का?

मोना : हो, त्याचा साधारण अर्थ मला माहीत आहे, पण तुम्हाला त्याचा जो विशेष अर्थ अभिप्रेत आहे, तो मात्र मला माहीत नाही.

श्रीमाताजी : ठीक आहे. व्यक्तीच्या जीवनातील हा खरोखरच महत्त्वाचा दिवस असतो. ज्या दिवशी परमेश्वर स्वतः आपल्यामध्ये अवतरतो किंवा ज्या दिवशी आपण शाश्वत-ब्रह्माच्या समोर उपस्थित असतो असा तो वर्षातील एक विशेष दिवस असतो. हा असा एक दिवस असतो की, ज्या दिवशी आपला आत्मा हा त्या शाश्वत-ब्रह्माच्या संपर्कामध्ये येतो आणि आपण थोडे जरी जागरूक राहिलो तर, आपण त्याची उपस्थिती आपल्या स्वतःमध्येच अनुभवू शकतो.

या दिवशी आपण थोडेसे जरी प्रयत्न केले तर, आपण अनेक जन्मांचे कार्य, एखादी वीज चमकून जावी त्याप्रमाणे क्षणार्धात पूर्ण करू

शकतो. आणि म्हणूनच तर मी वाढदिवसाला एवढे महत्त्व देत असते. कारण या दिवशी व्यक्ती जे साध्य करून घेऊ शकते ते खरोखरच अतुलनीय असते. आणि म्हणूनच मीसुद्धा व्यक्तीच्या वाढदिवसाला, त्या व्यक्तीची चेतना ऊर्ध्व दिशेने खुली करण्यासाठी कार्य करते ज्यामुळे, ती व्यक्ती शाश्वत–ब्रह्माच्या प्रत्यक्ष समोर येऊ शकते.

हा एक अत्यंत विशेष दिवस असतो, कारण हा निर्णयाचा दिवस असतो. या दिवशी व्यक्ती खरोखर प्रचंड प्रगती करू शकते, व्यक्ती या दिवशी अगदी परम चेतनेशी देखील ऐक्य पावू शकते. शाश्वत ज्योतीचा अंशभाग असणारा आपला आत्मा, त्या ज्योतीशी ऐक्य पावून, त्याने स्वतःच्या उगमस्रोताकडून काही ग्रहण करावे यासाठी म्हणून या दिवशी, ईश्वर आपल्याला शक्य तेवढ्या उच्चतर प्रांतामध्ये वर उचलून घेतो. हा दिवस म्हणजे जीवनातील खरोखरच एक नामी संधी असते. व्यक्ती या दिवशी इतकी खुली, इतकी ग्रहणशील असते की तिला त्या दिवशी जे जे काही प्रदान करण्यात आलेले असते ते ते सारे ती आत्मसात करू शकते.

...हा असा एक दिवस असतो की, जेव्हा ईश्वर स्वतःहून आपल्यासाठी त्याची कवाडे सताड खुली करत असतो. जणू काही आपल्या अभीप्सेची ज्योत पुन्हा प्रज्वलित व्हावी म्हणून ईश्वर स्वतः आपल्याला निमंत्रित करत असतो.

हा असा एक दिवस असतो की, ज्या दिवशी ईश्वर आपल्याला काही गोष्टी प्रदान करत असतो. आपल्या वैयक्तिक प्रयत्नांनीसुद्धा आपण या गोष्टी प्राप्त करून घेऊ शकतो, नाही असे नाही; पण त्याला खूप वेळ लागतो, ते कठीण असते. ते तितकेसे सोपे नसते... आणि हा दिवस (आपला वाढदिवस) म्हणजे जीवनात मिळालेली एक संधी असते, तो ईश्वरी कृपेचा दिवस असतो.

*

(नंतर काही दिवसांनी श्रीमाताजींनी पुन्हा एकदा या विषयावर भाष्य केले होते.)

श्रीमाताजी : वाढदिवस ही अशी एक गूढ घटना आहे की जी आपल्याला त्यासंबंधी कोणतीही जाण नसतानादेखील अनिवार्यपणे, त्या विशिष्ट दिवशी घडते. या दिवशी शरीर मागे ठेवून आत्मा बाहेर पडतो आणि जोवर तो त्याच्या उगमस्रोतापर्यंत जाऊन पोहोचत नाही तोवर तो वर वर प्रवास करत राहतो. परमेश्वराकडून त्याची शक्ती, त्याचा प्रकाश, त्याचा आनंद आत्मसात करून, स्वतःचे पुनरुज्जीवन करण्यासाठी, आत्मा परमेश्वराप्रत ऊर्ध्वगामी होतो आणि वर्षभरासाठी त्याची शक्ती घेऊन खाली (परत शरीरात) येतो. हे वर्षामागून वर्षे घडत राहते.

– श्रीमाताजी (Sweet Mother - Luminious Notes by Mona Sarkar : 75-76)

*

## योगसिद्धीसाठी काळाचा उपयोग

(श्रीमाताजींनी Synthesis of Yoga मधील The Four Aids हा भाग वाचून दाखविला; त्यामध्ये योगसिद्धीसाठी शास्त्र, उत्साह, गुरू आणि काळ या चार गोष्टी साधनभूत ठरतात, असे म्हटले आहे. त्यावर एका साधकाने प्रश्न विचारला आहे.)

साधक : सर्वात शेवटी येथे काळ हा साधन म्हणून सांगितलेला आहे; यात म्हटले आहे की, ''सर्व गोष्टींचे त्यांच्या त्यांच्या स्वतःच्या कृतीचे असे एक आवर्तन असते आणि ईश्वरी कार्याचाही एक कालावधी असतो.'' ईश्वरी कार्याचा हा कालावधी कोणता?

श्रीमाताजी : प्रत्येक गोष्टींबाबत हा कालावधी भिन्न भिन्न असतो. प्रत्येक कृतीसाठी, प्रत्येक साक्षात्कारासाठी, प्रत्येक गतिविधीसाठी, निश्चित असा कालावधी असतो, जो भिन्न भिन्न असतो. अनेक कालावधी असे एकमेकांमध्ये गुंतलेले असतात; परंतु प्रत्येक गोष्ट एक प्रकारच्या तालबद्धतेने नियंत्रित होत असते आणि तो ताल हा त्या गोष्टीचा

# काही आठवणी

## दोन वाढदिवस

(श्रीअरविंद–आश्रमातील एक ज्येष्ठ साधिका श्रीमती हुता हिंडोचा आपली एक आठवण येथे सांगत आहेत.)

श्रीमाताजी माझ्याशी बोलताना म्हणाल्या होत्या की, ''उच्चतर जगतांचे या पृथ्वीवर आविष्करण झाले पाहिजे. आपण या जगामध्ये उच्चतर सत्य आणले पाहिजे.''

हे ऐकत असताना, मला श्रीमाताजींनी पूर्वीच म्हणजे १९६६ साली नवीन आणि जुन्या जगाविषयी जे सांगितले होते ते आठवले. श्रीमाताजी म्हणाल्या होत्या की, ''हुता, तुझे दोन वाढदिवस आहेत. एक भौतिक आणि दुसरा आध्यात्मिक. आत्ता हे जग जसे आहे त्याचे निदर्शक असणारे एक शुभेच्छापत्र आज मी तुला देते. हे बघ,'' असे म्हणत त्यांनी खूप गडद रंग असलेल्या एका शुभेच्छापत्राकडे निर्देश केला आणि त्या म्हणाल्या, ''आत्ताचे हे जग असे आहे. तुझ्या आध्यात्मिक वाढदिवसाला मी तुला भावी जगाचे शुभेच्छापत्र देईन.''

आणि मग नोव्हेंबरमधील माझ्या आध्यात्मिक वाढदिवसाच्या निमित्ताने (ज्या दिवशी हुता यांची श्रीमाताजींशी पहिली भेट झाली तो दिवस.) त्या मला म्हणाल्या, ''सप्टेंबर महिन्यामध्ये मी तुला हे जग जसे आहे तसे दर्शविणारे शुभेच्छापत्र दिले होते. आत्ता दिलेले हे शुभेच्छापत्र मात्र भावी जगाचे आहे.'' त्यांनी हलक्या निळ्या, हिरव्या आणि चंदेरी रंगामध्ये काढलेल्या सुंदर शुभेच्छापत्राकडे निर्देश केला आणि म्हटले, ''भावी जग हे असे असले पाहिजे.'' मग त्यांनी ते शुभेच्छापत्र उघडले.

त्याच्या एका बाजूला सुवर्ण अक्षरात 'ॐ' असे लिहिलेले होते आणि दुसऱ्या बाजूच्या भागामध्ये श्रीमाताजींनी लिहिले होते, ''तुझे जीवन समग्रतया आणि निःशेषतया परमेश्वराद्वारे संचालित होऊ दे.'' हे वाचल्यावर, माझे डोळे कृतज्ञतेने भरून आले. त्यानंतर आम्ही दोघीही

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354

A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमश:)

### २४ एप्रिल २०१०

पूर्णपणे अविचल राहा, तुमचे मन व तुमचे हृदय श्रीअरविंदांच्या आणि माझ्या प्रभावाप्रत खुले करा. सर्व परिस्थितीमध्ये कायम असणाऱ्या आंतरिक नीरवतेमध्ये तुमच्या चित्तवृत्ती खोलवर ओढून घ्या. त्या नीरवतेच्या तळाशी जाऊन तेथून मला आवाहन करा. तुम्ही असे केलेत तर तुमच्या अस्तित्वाच्या केंद्रस्थानी तुम्हाला माझे दर्शन होईल.

– श्रीमाताजी (CWM 16 : 165)

*

### १५ ऑगस्ट २०१०

विश्वाच्या इतिहासामध्ये श्रीअरविंद ज्याचे प्रतिनिधित्व करतात, ती एखादी शिकवण नाही, तो एखादा साक्षात्कारसुद्धा नाही तर, ती परमेश्वराकडून थेटपणे करण्यात आलेली एक निर्णायक कृती आहे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 04)

*

# ईश्वराबद्दलचे संपूर्ण प्रेम

(श्रीमती कैलासदीदी झवेरी या श्रीमाताजी-निर्मित 'ऑरोविल' या वैश्विक-नगरीच्या युनेस्को विभागाच्या मुख्य सचिव होत्या. त्यांनी त्यांच्या आत्मवृत्तामध्ये कथन केलेली ही हकीकत...)

श्रीमती कैलासदीदी झवेरी यांनी त्यांच्या एका वाढदिवसाच्या महिन्याच्या पहिल्या तारखेला श्रीमाताजींकडे एक प्रार्थना लिहून पाठविली. ''परम आणि प्रिय माते, मी तुझ्या दिव्य उपस्थितीच्या शक्तीस आवाहन करत आहे. मी तुझ्या प्रेमामध्ये संपूर्णपणे एकरूप व्हावे आणि तुझ्या दिव्य चेतनेमध्ये जीवन जगावे असे मला वरदान दे; जेणेकरून तुझे दिव्य सत्य माझ्याद्वारे त्याच्या पूर्ण वैभवानिशी आणि शक्तीनिशी आविष्कृत होऊ शकेल. जेणेकरून ज्या कार्यासाठी तू हे साधन भूतलावर आणले आहेस ते कार्य हे साधन संपूर्ण समर्पित होऊन पूर्णत्वास नेऊ शकेल, असे वरदान दे.'' वाढदिवसाला श्रीमाताजींना भेटून त्यांचे आशीर्वाद घ्यायचे हा आश्रमातील नेहमीचा रिवाज होता.

श्रीमाताजी कैलासदीदींना म्हणाल्या, ''कैलास, तुम्ही माझ्याकडे नवजन्म मागितला होता आणि मी तो तुम्हाला दिला आहे.'' असे म्हणून त्यांनी त्यांचे दोन्ही हात कैलासदीदींच्या डोक्यावर ठेवले. श्रीमाताजींनी त्यांना 'ईश्वराबद्दलचे संपूर्ण प्रेम' हा अर्थ ध्वनीत करणारे पांढऱ्या गुलाबाचे फूल दिले. आणि त्यासोबत शुभेच्छापत्र देखील. त्यावर लिहिले होते, ''तेजोमय व प्रगतिशील आगामी वर्षासाठी प्रेमाशीर्वाद...''

जेव्हा कैलासदीदी जाण्यास निघाल्या तेव्हा श्रीमाताजींनी त्यांना सांगितले, ''ईश्वराबद्दलचे संपूर्ण प्रेम प्रत्यक्षात उतरण्यासाठी एक जन्म पुरेसा नाही. एवढेच नव्हे तर, व्यक्तीने ईश्वराप्रति स्वतःस संपूर्ण अर्पित करायचे ठरविले तर त्यासाठीसुद्धा एक जन्म पुरेसा नाही. परंतु मी त्यासाठी तुला आशीर्वाद दिले आहेत.'' मूर्तिमंत प्रेम असणाऱ्या श्रीमाताजींच्या कृपेने भारावून जात, कैलासदीदींनी त्यांचा निरोप घेतला. त्यांच्या मनात श्रीमाताजींचे उद्गार रुंजी घालत होते.

आधारित – (I am with you by Kailas Jhaveri : 210-212)

*